ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 3 | April - 2016

Indian Streams Research Journal

# शेतकरी वर्गीय व जातीय स्तरीकरण आणि राजकारण

प्रभाकर दिगबंरराव सुर्यवंशी
राज्यशास्त्र विभागप्रमुख, स्वा. सौ. सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा (जं), जि. परभणी.

**सारांश:**

'इडा पीडा टळो बळीचे राज्य येवो' हा दुर्दम्य आशावाद आर्यपर्वापासून आजपर्यंत ग्रामीण जनतेच्या मनात कायम आहे. शेतकऱ्यांच्या नावाने राजकीय पक्ष, संघटना स्थापन होतात. नेतृत्व उदयास येते. चळवळी, आंदोलने चालविली जातात. प्रचार केला जातो, निवडणूका लढवल्या जातात, घोषणा केल्या जातात, आश्वासने दिली जातात, सरकार स्थापन केले जाते, पंचवार्षिक योजना आखल्या जातात. एवढे सारे शेती आणि शेतकऱ्यांच्या नावाने होत असूनही प्रत्यक्षात शेतकऱ्यांचे राज्य अस्तित्वात येऊ शकले नाही. किमान सत्तेत न्याय्य वाटाही त्याला मिळाला नाही. दुसऱ्या बाजूने सत्तेचे लाभही त्याच्यापर्यंत पोहचले नाहीत. अनेक पंचवार्षिक योजना, विकासाच्या योजना, आयोग स्थापन करुनही, अनेक अहवाल सादर करुनही बहुसंख्याक शेतकऱ्यांच्या स्थितीत फारशी सुधारणा झालेली नाही.

**प्रस्तावना:**



''स्वातंत्र्य मिळाले त्या संध्याकाळी देशाला उद्देशून पंडित नेहरुंनी जे जाहीर भाषण केले त्यात म्हटले होत की, 'बाकी इतर गोष्टीसाठी आपण थांबू शकतो पण शेतीसुधारणांसाठी नाही'. लालबहादूर शास्त्री यांनी तर 'जय जवान जय किसान हे घोषवाक्यच बनविले होते. इंदिरा गांधी, राजीव गांधी, अटल बिहारी वाजपेयी यांनी सुध्दा याला सुसंगतच भूमिका घेतल्या होत्या. पण 1950 नंतरच्या चार दशकांचा जर आढावा घेतला, इतिहास तपासला तर लक्षात येते ते असे की, आतापर्यंतची सर्व सरकारे, राजकीय पक्ष आणि त्यांच्या तथाकथित तत्त्वप्रणाली यांनी शेतकऱ्यांची पाठराखण करण्याचा पवित्रा घेवूनही प्रत्यक्षात मात्र ते नेहमी शेतकरी विरोधीच राहिले.''[1] आपल्या देशातील एकूण शेतकऱ्यांचा वर्गीय दृष्टिकोनातून विचार केल्यास शेतकरी वर्ग हा आपल्या देशातील संख्येने सर्वाधिक असलेला वर्ग होय. बहुसंख्याक असूनही भारतीय लोकशाहीत सर्वाधिक उपेक्षित वर्ग म्हणून शेतकऱ्यांचा उल्लेख करता येईल.

राजकीय दृष्टिकोणातून सर्वात मोठा मतदार वर्ग म्हणून शेतकरी वर्गाकडे पाहिले जाते, परंतु केवळ भावनिक घोषणा आणि आश्वासनांच्या आधारावर मतदान प्रक्रियेपुरतेच शेतकऱ्यांना मर्यादित ठेवले जाते. निवडणूकांच्या पूर्वी सारेच राजकीय पक्ष शेतकऱ्यांच्या बाजूने बोलतात, त्यांच्या हक्काची भाषा बोलतात, तथापि सत्तेवर येताच तोच राजकीय पक्ष उद्योजगताला समोर ठेवून आपली धोरणे आखतो. आपला देश कृषीप्रधान असून सुध्दा योजनाकर्त्यांनी आणि राजकीय नेत्यांनो सुध्दा शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासाकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. भारतीय संदर्भात लोकांना सक्रिय राजकारणापासून दूर ठेवण्यास कारणीभूत बाब अशी की, फार पूर्वीपासून या ठिकाणच्या राजकीय सत्तेवर, राजकीय व्यवस्थेवर सवर्ण अल्पसंख्याकांनी सातत्याने आपले वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही ही परिस्थिती कायम आहे. राजकीय पक्षांवरील नियंत्रणाच्या माध्यमातून आजही याच वर्गाने राजकीय सत्तेवरही नियंत्रण प्रस्थापित केलेले आहे. ''ओबीसींचे प्रमाण 52% आहे, तर संसदेतील प्रतिनिधीत्त्वाचे प्रमाण फक्त 8% आहे. याउलट ब्राह्मम व ठाकुरांचे प्रमाण लोकसख्येच्या 8% असतांना ते संसदेत मात्र 52% जागा बळकावतात''.[2] या पार्श्वभूमीवर भारतीय लोकशाही अल्पजनशाही बनली आहे. कोणतीही लोकशाही बहुजनांना सत्तेपासून दूर ठेवून कधीच यशस्वी होऊ शकत नाही.

वर्गीय संदर्भातून विचार केल्यास प्राचीन काळापासून राजकीय सत्तेकडून शोषित आणि उपेक्षित वर्ग म्हणून शेतकरी वर्गाचा उल्लेख करावा लागतो. बहुसंख्यांक असलेला शेतकरी वर्ग मात्र स्वातंत्र्योत्तर काळातही राजकीय सत्ता, राजकीय लाभ यापासून सातत्याने वंचित राहिला आहे.

एका निश्चित वर्गाचा निर्देश करण्यासाठी शेतकरी वर्ग ही संज्ञा वापरण्यात येत असली तरी प्रत्यक्षात शेतकरी एक 'वर्ग' की 'जात' याबाबत संभ्रम निर्माण व्हावा अशी स्थिती आहे. वर्ग ही व्यवसायाचा निर्देश करणारी संकल्पना आहे. ''मार्क्सच्या मते, उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये ज्यांची एकसमान स्थिती असते अशांचा वर्ग निर्माण होतो.''[3] मार्क्सच्या वर्गसंकल्पनेत अपेक्षित असलेला वर्ग ब्रिटीशपूर्व भारतात अस्तित्वात नव्हता. भारतात वर्ग ही संकल्पना जातीकडून करण्यात येणाऱ्या व्यवसायाशी संबंधीत असल्याने वर्ग जातीशी एकरुप झाल्याचे जाणवते. वर्ग आणि जात यात फार अंतर वाटत नाही. ''भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात शेतकरी वर्ग हा शब्द भ्रामक आहे.''[4] प्रत्यक्षात भारतीय समाजव्यवस्थेवर जातीव्यवस्थेचा एवढा प्रभाव आहे की, जातीने वर्गावरही मात केलेली दिसून येते. वर्गीय निष्ठांपेक्षा जातीय निष्ठा अधिक प्रबळ आहेत. ''जात ही भारतीय राजकारणातील सर्वात महत्त्वाचे सत्य आहे. सामान्य भारतीय सर्वकाही त्याग करु शकतो, परंतू जातीव्यवस्थेवरील आपल्या विश्वासास तो तिलांजली देऊ शकत नाही. जातीय संदर्भ विचारात न घेता भारतीय राजकारणाचे केलेले कोणतेही अध्ययन अपूर्णच आहे.''[5] म्हणूनच अनेक अभ्यासक शेतकरी वर्ग असा उल्लेख न करता शेतकरी जाती असा उल्लेख करतात. व्यवहारात एक वर्ग म्हणून संघटित असण्यापेक्षा जातीच्या आधारावरच शेतकरी एकजूट आहेत व जातीमुळेच एकमेंकांपासून विभक्त आहेत.

एक वर्ग म्हणून समग्र शेतकऱ्यांचा उल्लेख करण्यात येत असला तरी शेतकरी हा संघटित वर्ग नाही. असंघटित वर्ग म्हणून शेतकरी वर्गाचा उल्लेख करावा लागेल. शेतकरी वर्गांतर्गत विविध आधारावर मोठ्या प्रमाणात स्तरीकरण आढळून येते. काही प्रमुख घटकांच्या आधारे झालेले वर्गीकरण खालीलप्रमाणे दाखवता येईल.

### (i) जमीन मालकी घटकाच्या आधारावर वर्गीकरणः

शेतीक्षेत्रात जमीन मालकी किंवा जमीन धारणा हा वर्गीकरणाचा मुख्य आधार मानला जातो. अर्थात ''शेतजमीन धारणा त्या देशाचे भौगोलिक क्षेत्र आणि वातावरण याप्रमाणेच त्या ठिकाणची सामाजिक व्यवस्था, प्रथा, परंपरा, शेती कसण्याच्या पध्दती यावर अवलंबून असते.''[6] प्रामुख्याने जमीनीवर मालकी असणारे आणि जमीनीवर मालको नसणारे या दोन प्रमुख गटात शेतकऱ्यांचे वर्गीकरण करण्यात येते. यापैकी जमीनीवर मालकी असणाऱ्या गटात पुन्हा 1) मोठे शेतकरी 2) मध्यम शेतकरी 3) छोटे शेतकरी अशा तीन गटात वर्गीकरण करण्यात येते. दुसऱ्या गटात म्हणजेच जमीनीवर मालकी नसणाऱ्यांमध्ये 1) बटाईदार 2) खडकरी 3) भूमीहीन शेतमजूर अशा तीन गटात विभाजन करण्यात येते.

### अ) शेतजमीनीवर मालकी असणारा शेतकरी वर्गः

कायद्याच्या दृष्टिकोनातून जमीनीवर मालकी असणाऱ्या शेतकरी वर्गाचे केलेले वर्गीकरण अधिक स्थिर स्वरुपाचे मानले जाते. शेतकऱ्यांनी धारण केलेल्या जमीनीच्या धारणक्षेत्रावरुन शेतकऱ्यांचे वर्गीकरण प्रामुख्याने आधारभूत मानले जाते. शासकीय योजनेचा लाभ मिळण्याकरीता प्रामुख्याने जमीनधारणेचे प्रमाण हाच प्रमुख निकष मानला जातो. जमीन मालकी या आधारावर करण्यात येणारे शेतकऱ्यांचे वर्गीकरण प्रामुख्याने खालीलप्रमाणे अधिक स्पष्ट करता येईल.

#### 1) मोठे शेतकरी :

दहा हेक्टरपेक्षा अधिक शेती असलेले शेतकरी हे मोठे शेतकरी म्हणून ओळखले जातात. पूर्वीच्या जमीनदार वर्गातील शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात समावेश या गटात होतो. परंपरेने चालत आलेला हा अभिजात वर्ग आहे. हा शेतकरी वर्ग संख्येने सर्वाधिक कमी असला तरी एकंदरीत राजकारणावर आणि सत्तेवर या शेतकऱ्यांची मजबूत पकड आहे.

#### *2) मध्यम शेतकरी :*

दोन हेक्टर ते दहा हेक्टर दरम्यान शेती असलेला शेतकरी मध्यम शेतकरी म्हणून ओळखला जातो. स्थानिक पातळीवरील राजकीय सत्तेवर या शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रभाव असून राजकारणी आणि अधिकाऱ्यांशी संगमत करुन शेतीविषयक योजनांचे लाभ स्वतःकडे वळविण्यात हा वर्ग आघाडीवर आहे.

#### *3) अल्पभूधारक शेतकरीः*

या गटामध्ये प्रामुख्याने उपजीविकेचे साधन म्हणून शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश होतो. उपजीविकेसाठी आवश्यक असलेले किमान जमीनक्षेत्र धारण करणारा शेतकरी अल्पभूधारक शेतकरी म्हणून ओळखला जातो. साधारणतः दोन हेक्टरपर्यंत शेती असणाऱ्या शेतकऱ्यांचा या वर्गात समावेश येतो. सातत्याने आर्थिक विवंचनेत असणारा, शासनाच्या विविध योजनांपासून वंचित असा हा शेतकऱ्यांचा वग आहे.

### *ब) शेतजमीनीवर मालकी नसणारा शेतकरी वर्ग:*

सद्यस्थितीत या वर्गाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे तीन गटात करण्यात येते.

### 1) बटाईदार (Share-Coopers):

अशा शेतकऱ्यांकडे स्वतःच्या मालकीची शेती नसते किंवा असल्यास ती अत्यल्प असते म्हणून तो मोठ्या शेतकऱ्यांकडील त्याच्या मालकीची जमीन ठराविक हिस्याने किंवा भागाने कसत असतो. आधुनिक काळात नोकरी निमित्ताने शहरांमध्ये स्थायिक झालेल्या कुटुंबाची शेती अशाप्रकारे भागाने किंवा हिस्याने देण्यात येते. एकूण उत्पन्नापैकी कितवा हिस्सा शेतीमालकाला द्यायचा आणि कितवा भाग आपण घ्यायचा यासंबंधीची बोलणी अगोदर केली जाते. प्रामुख्याने यामध्ये बटाईने किंवा तिजाईने शेती केली जाते.

### 2) खंडकरी (Tenants):

प्रामुख्याने या वर्गातही शेतमजूर किंवा अल्पभूधारक शेतकरी येतात. जास्त शेती असल्यामुळे ज्यांना स्वतःची पूर्ण शेती लागवडीखाली आणता येत नाही. अशा शेतकऱ्यांकडील उर्वरीत शेती किंवा ज्यांच्याकडे शेती अत्यल्प असल्याने त्यामध्ये भांडवल गुंतवणूक करावयाससुध्दा परवडत नाही. अशा शेतकऱ्यांकडील शेती किंवा नोकरीच्या निमित्ताने जे शेतकरी कुटुंबे शहरात स्थायिक झाली आहेत अशा कुटुंबाच्या मालकीची गावाकडील शेती ठराविक रोख स्वरुपाचा मोबदला देऊन ठराविक एक किंवा दोन वर्षाकरीता कसण्यासाठी घेणाऱ्या शेतकऱ्यांना खंडकरी म्हणतात. आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना रोख स्वरुपात मदत करुन त्यांच्याकडील शेती स्वतःकडे कसण्यासाठी घेण्याकडेही या शेतकऱ्यांचा कल असतो.

### 3) भूमीहीन शेतमजूर (Landless Labourers):

शेतीवर मालकी नसलेला, परंतु पूर्णतः शेतीशी एकरुप झालेला आणि स्वतः आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी पूर्णतः शेतीवरच अवलंबून असणारा एक शेतकऱ्यांचा वर्ग ग्रामीण भागात पाहावयास मिळतो. उदरनिर्वाहासाठी इतर काम करण्याचे कोशल्य त्याच्याकडे नसते. म्हणूनच या वर्गाला अकुशल कामगार असेही म्हटले जाते. प्रामुख्याने केवळ शेतीवरच श्रम करुन उदरनिर्वाह करणाऱ्या मजूरांचा यात समावेश होतो. ग्रामीण भागात आजही प्रचलित असलेल्या शेतीवर काम करणाऱ्या सालगड्यांचा उल्लेख प्रामुख्याने यामध्ये करावा लागतो. वर्षाकाठी श्रमाचा मोबदला म्हणून ठराविक स्वरुपात धान्य आणि ठराविक स्वरुपात रोख रक्कम त्याला देण्यात येते.

### (ii) आर्थिक घटकाच्या आधारे शेतकऱ्यांचे वर्गीकरण:

आधुनिक काळात शेतकरी वर्गांतर्गत वर्गनिर्मितीमुळे मोठ्या प्रमाणात स्तरीकरण झालेले आढळते. कारण, ''आता शेती केवळ उत्पादनाचे साधन राहिले नसून शेतीत भांडवल गुंतवणूक होत आहे. अगदी शेतीवर आधारीत राजकारणही होत आहे. या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांमध्ये वर्ग निर्माण झाले. आर्थिक आधारावर ही मांडणी प्रामुख्याने तीन वर्गात करण्यात येते. 1) सधन शेतकरी 2) मध्यम शेतकरी 3) गरीब शेतकरी.''[7]

### 1) सधन शेतकरी:

या वर्गातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मजबूत असते. हा शेतकरी स्वतः शेती कसत नाही. यांच्या शेतीवर छोटे शेतकरी तसेच शेतमजूर काम करतात. शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक करण्याची तसेच अत्याधुनिक संसाधनाचा वापर करण्याची क्षमता या वर्गाकडे आहे. या शेतकरी वर्गालाच भांडवलदार शेतकरी असेही म्हणतात. राजकरणात हा वर्ग सक्रिय आहे. आपले आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी तो शासनावर सातत्याने दबाव आणत असतो.

### 2) मध्यम शेतकरी :

या वर्गातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती समाधानकारक असते. कर्जबाजारीपणापासून साधारणतः हा वर्ग मुक्त आहे. प्रामुख्याने कुटुंबातील सर्व सदस्यांकडून शेती कसण्याचे काम करण्यात येते. शेती कसण्याच्या बाबतीत हा वर्ग आत्मनिर्भर असतो. प्रसंगी मजुरांकडून शेतीतील कामे करुन घेण्यासाठीही हा वर्ग तत्पर असतो. नगद उत्पन्न देणारी पिके घेण्यावर या वर्गाचा भर आहे.

### 3) गरीब शेतकरी :

सातत्याने आर्थिक विवंचनेत असणाऱ्या शेतकऱ्यांचा या वर्गात समावेश करण्यात येतो. बहुतांश शेतकरी कर्जबाजारी असतात. राहणीमानाचा दर्जा निम्न स्वरुपाचा असतो. यांच्या मालकीच्या शेतीचा आकार फारच लहान असल्याने केवळ शेतीवरील उत्पन्नावर या वर्गाची उपजीविका होऊ शकत नाही. म्हणून ते दुसऱ्याच्या शेतावर मजुरी करतात किंवा बटाईने दुसऱ्याची शेती करतात. मोठ्या प्रमाणात निरक्षरता व अडाणीपणा आणि सधन शेतकऱ्यांवरील अवलंबित्व हे या वर्गाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

### (iii) सिंचन सुविधांच्या आधारावर शेतकऱ्यांचे वर्गीकरणः

प्रामुख्याने या आधारावर करण्यात येणारे वर्गीकरण हे शेतकऱ्यांचे वर्गीकरण नसून शेतीचे वर्गीकरण आहे. कोरडवाहू शेती आणि ओलीताची शेती असे हे वर्गीकरण आहे. शेतीसाठी सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे किंवा नाही यावरुनही ओलीताची शेती करणारे शेतकरी तसेच कोरडवाहू शेती करणारे शेतकरी असे दोन प्रकार पडतात.

### (iv) पिकपध्दतीच्या आधारावर शेतकरी वर्गांतर्गत स्तरीकरणः

शेतीमध्ये कोणती पिके घेतली जातात यावरुन फळबाग करणारा **बागायतदार शेतकरी** आणि **पारंपरिक पिके घेणारा शेतकरी** असे दोन प्रकार पडतात.

### (v) भांडवली संसाधनांच्या आधारावर शेतकऱ्यांचे वर्गीकरणः

शेती करण्यामागचा उद्देश किंवा शेतीत वापरली जाणारी भांडवली संसाधने यावरुन **व्यापारी भोती करणारा भांडवलदार शेतकरी** आणि **उदरनिर्वाहासाठी शेती करणारा शेतकरी** असे दोन प्रकार पडतात.

### (vi) उत्पन्नकर चुकविण्यासाठी शेतीचा वापर करणारे शेतकरीः

कायद्यामध्ये 'शेतजमीनीवर मालकी असलेला तो शेतकरी' अशी शेतकऱ्यांची व्याख्या करण्यात आली आहे. यामुळे कायद्याच्या दृष्टिकोनातून केवळ नावाचा शेतकरी असलेला एक वर्ग उदयास आला आहे. आपले इतर व्यवसाय सांभाळत शेतकऱ्यांच्या नावाचा वापर करुन ते सत्तेपर्यंत पोहचले आहेत. संसदेत आणि विधिमंडळात असा शेतीव्यवसाय दाखविणाऱ्या लोकप्रतिनिधींची संख्या लक्षणीय आहे. अशा शेतकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाण्याचे कारण म्हणजे शेतीमधील उत्पन्नाला उत्पन्नकरामधून दिलेली सूट हे आहे. आपला दोन नंबरचा पैसा लपविण्यासाठी शेतीचा वापर केला जातो. ठेकेदार, दलाल, व्यापारी, उद्योजक, सिनेअभिनेते यांच्या बरोबरीने प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, वकील असा पांढरपेशी शहरी वर्गही आपला उत्पन्नकर वाचविण्यासाठी स्वतःला शेतकरी म्हणून सिध्द करत आहे.

### (vii) गुंतवणूक म्हणून शेतजमीनीवर मालकी प्रस्थापित करणारेः

यामध्ये प्रामुख्याने ठेकेदार, मोठे उद्योगपती, सिनेनट, राजकारणी यांचा समावेश होतो. प्रामुख्याने शहरालगतच्या महत्त्वाच्या ठिकाणच्या, भविष्यातील बृहत आराखड्यांचा विचार करुन ज्या जमिनीला महत्त्व प्राप्त होईल अशा जमिनी कितीही किंमत देऊन खरेदी केल्या जातात. उद्योगाला किंवा एखाद्या गृहप्रकल्पाला जागा मिळवून देणारे दलाल कमीशन घेऊन वेगवेगळ्या मार्गाचा वापर करुन शेतकऱ्यांकडून जमीन खरेदी करतात. नफा मिळविणे हाच भांडवली अर्थव्यवस्थेचा नियम असल्याने अतिरिक्त भांडवल असलेला वर्ग नफा मिळविण्यासाठी खात्रीशिर गुंतवणूक म्हणून जमीन विकत घेऊन त्यात गुंतवणूक करुन कायद्याच्या दृष्टिकोनातून शेतकरी ठरलेला नफेखोरांचाही एक वर्ग उदयास येत आहे. शेतकऱ्यांच्या शेतजमिनी भांडवलदार बिल्डरांना विकून देणारा दलालांचा वर्ग शेतकरी जातीतून निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांच्या शोषकांना साहाय्य करुन शेतकऱ्यांच्या शोषणाच्या प्रक्रियेत तो सामील झाला आहे.

अशाप्रकारे विविध आधारावर शेतकरी वर्गात मोठ्या प्रमाणात स्तरीकरण आढळते. त्यामुळे शेतकरी वर्ग हा एकसंघ नसून तो मोठ्या प्रमाणात विखुरलेला वर्ग आहे. त्यांचे हितसंबंध वेगवेगळे आहेत. प्रसंगी ते परस्परविरोधी सुध्दा आहेत. त्यामुळे वेळप्रसंगी शेतकरी परस्परांच्या विरोधात संघर्षाची भूमिका सुध्दा घेतात. थोडक्यात शेतकरी वर्गाअंतर्गत मोठ्या प्रमाणात विषमता आणि अंतर्गत कलह अस्तित्त्वात आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात हरीत क्रांतीमुळे ही विषमता आणि अंतर्गत संघर्ष अधिक तीव्र झाल्याचे दिसून येते.

### जात घटकाच्या आधारावर शेतकऱ्यांचे वर्गीकरण :

शेतकऱ्यांचा वर्ग म्हणून निर्देश करण्यात येत असला तरी भारतीय संदर्भात वर्गाचे आधार जातीवर आधारीत व्यवसाय असल्यामुळे वर्गामध्येही जातीय संदर्भ पूर्णतः पुसले गेले नाहीत. विशिष्ट जाती या परंपरागत शेती करणाऱ्या जाती म्हणून ओळखल्या जातात. त्यामुळे शेतकरी वर्गातही या जातींचेच प्राबल्य आढळते. त्यामुळे भारतीय शेतकरी वर्गीय भावनेपेक्षा जातीय भावनेनेच अधिक संघटित झालेला दिसतो. शेतकरी वर्गांतही जातीय संघर्ष आणि तणाव मोठ्या प्रमाणात पहावयास मिळतात. शेतकरी वर्ग हा वर्ग म्हणून संघटित असण्यापेक्षा जात म्हणूनच अधिक संघटित आहे. याप्रमाणेच जातीच्या आधारावरही तो मोठ्या प्रमाणात विखुरलेलाही दिसून येतो. जातीच्या आधारावर प्रामुख्याने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येते.

### 1) मराठा किंवा कुणबी शेतकरी:

मराठा आणि कुणबी ही महाराष्ट्रातील संख्येने सर्वाधिक असलेली जात होय. महाराष्ट्रात पूर्वापारपणे शेती करणारे आणि शेतकरी वर्गात संख्येने सर्वाधिक असलेली ही जात आहे. प्रामुख्याने सांप्रत शेती करणारी जात म्हणून या जातीचा उल्लेख करावा लागतो. मराठा हा महाराष्ट्रातील पूर्वापार सत्ताधारी जात होय. फार मोठा समृध्द राजकीय वारसा या जातीला आहे. ''स्वातंत्र्योत्तर काळात मराठा आणि कुणबी जातीतील पुरोगामी विचारवंतानी दोन्ही जातीचे एकीकरण करण्यास सुरुवात केली. परिणामी मराठा आणि कुणबी या दोन स्वतंत्र जाती नसून एकाच जातीची दोन नावे आहेत.''[8]

### 2) माळी शेतकरी :

शेतीबरोबरच फुलांची शेती करणारा, बागकाम करणारा शेतकऱ्यांचा वर्ग हा माळी म्हणून ओळखण्यात येऊ लागला. मूळ शेतकरी कुळातील हा वर्ग असून स्वतंत्र जातीचा दर्जा त्याने प्राप्त केला आहे. ''या जातीतही अनेक स्तर असून जवळपास 12 पेक्षाही अधिक उपजातीत हा समाज विखुरला गेला आहे. या सर्व उपजातींमध्ये फुलमाळी सामाजिकदृष्ट्या श्रेष्ठ मानले जातात.''[9] सद्यस्थितीत हा समाज साखर उद्योगात आघाडीवर असून आर्थिकदृष्ट्या संपन्न आहे.

### 3)धनगर शेतकरी:

संपूर्ण महाराष्ट्राभर आढळणारी ही शेतकरी जात आहे. शेती करताना शेतीला जोडधंदा म्हणून शेळी–मेंढी पालनाचा उद्योग करणारा शेतकरी नंतरच्या काळात धनगर म्हणून ओळखला जाऊ लागला. मूळ शेतकरी कुळातील हा वर्ग असून आज एक स्वतंत्र जात म्हणून त्यांने दर्जा प्राप्त केला आहे. ''या जातीअंतर्गत 23 उपजाती आहेत. यापैकी हटकर, धनगर प्रामुख्याने निजाम राज्यात विशेषत: नांदेड आणि परभणी जिल्ह्यात आढळतात.''[10]

### 4) आदिवासी शेतकरी:

डोंगराळ आणि जंगलाने व्यापलेल्या भागात राहून शेती करणारा शेतकरी प्रामुख्याने आदिवासी शेतकरी आहे. पारंपरिक पध्दतीने शेती किंवा नैसर्गिक शेती करण्यावर त्याचा भर असून त्याचे वास्तव्य प्रामुख्याने जंगलयुक्त व डोंगराळ भागात असते.

### 5) मागासवर्गीय शेतकरी :

ग्रामीण भागातील बलुतेदार म्हणून समजल्या जाणाऱ्या जातींचा याप्रमाणेच परंपरेने मागास आणि अस्पृश्य म्हणून समजल्या जाणाऱ्या जातीतील शेतकऱ्यांचा समावेश या गटात करता येईल. या कुटुंबाकडे असलेल्या जमिनी ह्या वतने म्हणून मिळालेल्या आहेत. भूदान चळवळ आणि भूसुधारणा कायद्यामुळेही काहींना जमिनी मिळालेल्या आहेत. बहुताश जमिनी निकृष्ट दर्जाच्या आणि लहान आकाराच्या आहेत. ह्या जातींमधील शेतकऱ्यांची संख्या सर्वात कमी आहे.सुतार, शिंपी, नाव्ही, कुंभार, चांभार, महार, मांग या मागास जातींकडे काही प्रमाणात शेती आहे. महार हे बारा बलुतेदारांपैकी एक होत. महार ही जात महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्यात आढळते. ''महार जातीअंतर्गत 53 उपजातींची नोंद आहे.''[11] महाराष्ट्रात महार जातीच्या खालोखाल संख्या असणारी जात म्हणजे मांग होय. ''वेगवेगळ्या 24 कुळगटात ही जात विभागली असून त्यांच्यात वैवाहिक संबंध होत नाहीत.''[12] चांभार ही जात संपूर्ण महाराष्ट्रभर आढळते. ''या जातीत प्रामुख्याने तीन संप्रदाय आढळतात. हराळे वैष्णव, रोहीदासी आणि लिंगायत, याशिवाय अनेक उपजाती आणि उपजाती अंतर्गत अनेक कुळ आणि त्यातही देवक पाहून विवाहविषयक संबध केले जातात.''[13]

थोडक्यात वर्गीय व जातीय आधारावर शेतकरी वर्गातील स्तरीकणाचा अभ्यास केल्यास एक बाब स्पष्ट होते की, शेतकरी मोठ्या प्रमाणात असंघटित आहे. त्यांचे वर्गीय हितसंबंध वेगवेगळे आहेत. बहुतेक वेळेस एक वर्ग म्हणून शेतकऱ्यांचा निर्देश करण्यात येत असला तरी वर्ग म्हणूनही तो एकसंघ नाही. समान व्यवसायिक आणि आर्थिक हितसंबध जापासण्यासाठी वर्गात आढळून येणारी एकजुटीची भावना व त्या आधारे संघर्ष करुन आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्याची प्रवृत्ती शेतकरी वर्गात आढळत नाही. शेतकरी वर्गांतर्गत मोठ्या प्रमाणात विषमता आणि स्तरीकरण आढळून येते. जातीय आधारावर सुध्दा अनेक जातीत विभागणी तसेच जाती अंतर्गत पोटजाती आणि पोटजातीतही श्रेष्ठ–कनिष्ठ स्तरीकरण यामध्ये पूर्णत: विखुरल्या गेल्यामुळे शेतकऱ्यांचा प्रभाव क्षीण झाला आहे.

आपल्या देशात प्रत्यक्ष कायद्यामध्ये शेतकऱ्यांची व्याख्या करतांना त्या लोकांनाही समाविष्ट करण्यात आले आहे की, जे स्वत: शेती करीत नाहीत, परंतू जमिनीचे मालक आहेत. यामुळे व्यापारी आणि नोकरदार वर्ग सुध्दा स्वत:ला शेतकरी म्हणून सिध्द करत असतात. त्यामुळे केवळ शेतीवरील मालकी हक्क या समान मुद्याशिवाय, वर्ग म्हणून हितसंबध जोपासण्याची जी प्रवृत्ती असावयास पाहिजे ती भारतीय शेतकऱ्यांमध्ये नाही. प्रत्यक्षात शेतीवर कष्ट करुन उपजीविका करणारा शेतकरी आणि आर्थिक फायद्यांसाठी शेतजमिनीवर मालकी ठेवणारा शेतकरी यांच्या हितसंबंधात परस्पर विरोध आहे. शेतकऱ्यांचा एक संघटित वर्ग म्हणून शेतकरी आपली ओळख निर्माण करु शकला नाही. तो पूर्णत: असंघटित आहे. हितसबंधाचे रक्षण करण्यासाठी संघटित कृती, शासन सत्तेवर प्रभाव किंवा दबाव त्यांच्याकडून निर्माण केला जात नाही. थोडक्यात वर्ग जाणीव त्यांच्यात अद्याप रुजलेली नाही. सत्ताधारी व विरोधी पक्षाकडून सुध्दा शेतकऱ्यांच्या नावाचा वापर केवळ मतदार बँक म्हणून केला जातो. शेतकरी मात्र जातीय आणि वर्गीय दोन्ही आधारावर विखुरलेला आहे. त्यांच्यात समग्र शेतकरी वर्ग ही व्यापक जाणीव निर्माण होण्याची नितांत आवश्यकता आहे. जोपर्यंत एक वर्ग म्हणून शेतकरी संघटित होत नाही तोपर्यंत तो राजकारण प्रभावीत करु शकणार नाही.

**संदर्भसूची :–**


1)नाडगोंडे गुरुनाथ, ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, 2002, पृ.40.

2)पळशीकर सुहास, व्होरा राजेंद्र (संपा.), (अनु. लेले चित्रा) भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2010, पृ.260.

3)Ali Ashraf, Sharma L. N., Political Sociology: a new grammer of politics, Universities Press, Hyderabad, 1988. P.42.

4)वर्मा ज्योती, सामाजिक जनांकिकी, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली,2007,पृ.230.

5)मोदी महावीर प्रसाद, मोदी सरोज (संपा.), भारतीय राजनीति की प्रवृत्तियाँ, कॉलेज बुक डिपो, जयपूर, 2008, पृ. 70.

6)Mamoria C.B., Tripathi Badri Bishal, Agricultural Problems of India, Kitab Mahal, Delhi, 2007, P.124.

7)दोषी एस. एल., जैन पी.सी., भारतीय सामाजिक व्यवस्था, नेशनल पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, 2007 पृ.97.

8)Pathak A. S. (Editors), Maharashtra: Land and its People, Gazetteers Department, Government of Maharashtra, Mumbai, 2009, P.87,88,89.

9)Pathak A. S. (Editors), op.cit. P.83, 84.

10)Pathak A. S. (Editors), op.cit. P.52, 53.

11)Pathak A. S. (Editors), op.cit. P.81.

12)Pathak A. S. (Editors), op.cit. P.85, 86.

13)Pathak A. S. (Editors), op.cit. P.50.